# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन शिवार, नाशिक - 422 222.

दूरध्वनी - (0253) 2231714, 2231715, 2230027, 2230459


जावक क्र. : यचममुवि/आस्था/पदोन्नती/२०१७/४/754 दिनांक : २२.०७.२०१७

संदर्भ : (१) The YCMOU Group B, C & D Staff Recruitment and Promotion Rules १९९२ (Draft) (व्यवस्थापन मंडळ सभा दि. १२.०९.१९९२, विषय क्र. १००.९२.०९)

(२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/का-१२ दिनांक १२ सप्टेंबर, २०१६

(३) सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना, दिनांक ६ जून, २०१७, महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार - अ, दिनांक ७ जून, २०१७

**विषय - सहायक या संवर्गात पदोन्नती**

## कार्यालयीन आदेश

मा. कुलगुरुंच्या मान्यतेनुसार आणि पदोन्नती समितीच्या शिफारशीनुसार **शिपाई** या संवर्गातील खालील कर्मचाऱ्यांना **सहायक (वेतनसंरचना रु.५२००-२०२०० ग्रेड वेतन रु.२४००)** या संवर्गात खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून रिक्त पदावर पदोन्नती देण्यात येत असून पदोन्नतीनंतरची पदस्थापना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम | पदोन्नतीचे पद | सध्याचा विभाग | पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेला विभाग |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. विजयसिंह बबनसिंह रजपूत शिपाई | सहायक (खुला प्रवर्ग) | विभागीय केंद्र, कोल्हापूर | विभागीय केंद्र, पुणे |
| २. | श्री. मनोहर निंबा सैदाणे शिपाई | सहायक (खुला प्रवर्ग) | शैक्षणिक सेवा विभाग | विभागीय केंद्र, मुंबई |

१. उपरोक्त पदोन्नती देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांनी पदोन्नतीच्या पदावर पदस्थापना करण्यात आलेल्या ठिकाणी सदर आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाचे आंत हजर होऊन रुजू अहवाल विभाग प्रमुखांमार्फत कुलसचिव कार्यालयास दोन प्रतीत सादर करावा.

२. विहीत कालावधीत हजर न झाल्यास त्यांना ही पदोन्नती स्विकारण्यामध्ये स्वारस्य नाही असे समजून त्यांच्या पदोन्नतीचे आदेश रद्द करण्यात येतील. तसेच वित्त विभाग निर्णय क्र. वेतन-११०९/ प्र.क्र.४४/सेवा-३ दिनांक ०१-०४-२०१० नुसार त्यांना आश्वासित प्रगती योजना अंतर्गत वरिष्ठ वेतन श्रेणीचा लाभ मिळण्यास पात्र झाले तर त्यांनी नाकारलेली ही पदोन्नती विचारात घेऊन आश्वासित प्रगती योजनेच्या लाभाबाबत निर्णय घेण्यात येईल.

३. पदोन्नती देण्यात आलेल्या कर्मचाऱ्याने सदर पदोन्नती नाकारल्यास शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/का-१२ दिनांक १२ सप्टेंबर, २०१६ मध्ये आदेशित केल्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४. शासन निर्णय वित्त विभाग क्र. पीएवाय-१०८२/सीआर-११००(एक)/एसईआर-३ दि. ०६.११.१९८४ नुसार पदोन्नतीच्या पदावर हजर झाल्यापासून (लागू असल्यास) एक महिन्याचे आंत वेतन निश्चितीबाबत विकल्प देणे आवश्यक असून एकदा दिलेला विकल्प अंतिम समजण्यात येईल. सोबत विकल्पाचा नमुना दोन प्रतीत जोडंला आहे. विहीत मुदतीत विकल्प सादर न केल्यास विकल्प दिला नाही असे गृहीत धरून वेतन निश्चिती करण्यात येईल.

५. विद्यापीठाच्या ध्येयधोरणानुसार संबंधितांनी पदोन्नती दिलेल्या पदावर अधिक महत्त्वाची कर्तव्ये व जबाबदारीची कामे कार्यकुशलतेने करणे बंधनकारक राहील. तसेच त्यांचेकडे असलेल्या कामाव्यतिरिक्त आवश्यकतेनुसार विद्यापीठातील सक्षम अधिकाऱ्याने सोपविलेले काम व जबाबदारी निष्ठेने पार पाडावी लागेल. पदोन्नती दिलेल्या पदावरील काम समाधानकारक आढळून न आल्यास पूर्वपदावर पदावनत करण्यात येईल.

६. भविष्यात आपली बदली विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही सध्या आस्तित्वात असलेल्या किंवा भविष्यात निर्माण होणाऱ्या विभागीय किंवा अन्य केंद्रावर करण्यात येईल.

७. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ कायद्यातील तरतूदी, अनुषंगिक अधिनियम, नियम व अध्यादेश व त्यामध्ये वेळोवेळी होणारे बदल, त्याचप्रमाणे विद्यापीठाने प्रमाणित केलेली आचारसंहिता संबंधितांवर बंधनकारक राहील व त्या सर्वांचे काटेकोरपणे पालन करावे लागेल.

सोबत विकल्प नमूना

**(डॉ.दिनेश भोंडे)**
**कुलसचिव**

**प्रति,**

**१. श्री. रजपूत विजयसिंह बबनसिंह, शिपाई, यचममुविचे विभागीय केंद्र, कोल्हापूर**
**२. श्री. सैंदाणे मनोहर निंबा, शिपाई, शैक्षणिक सेवा विभाग, यचममुवि, नाशिक**

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :**

१. मा. कुलगुरू यांचे कार्यालय
२. वित्त अधिकारी
३. संचालक, शैक्षणिक सेवा विभाग
४. प्र. संचालक, विद्यार्थी सेवा विभाग
५. विभागीय संचालक, विभागीय केंद्र, कोल्हापूर
६. विभागीय संचालक, विभागीय केंद्र (१) मुंबई (२) पुणे
७. वैयक्तिक नस्ती
८. कार्यालयीन आदेश धारिका
९. आरक्षण कक्ष
१०. विद्यापीठ संकेत स्थळ